# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २० जुलै, २०२३ / आषाढ २९, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | उप मुख्यमंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | |
| (४) | गृहनिर्माण मंत्री | |
| (५) | बंदरे मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २५**

---

### नवी मुंबईतील खारघर येथे "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार प्रदान सोहळ्यात उष्माघाताने नागरिकांचे झालेले मृत्यु

**(१) * ६४७३५ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील खारघर येथे मा. आप्पासाहेब धर्माधिकरी यांना "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार प्रदान करण्यासाठी शासकीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाच्या नियोजशून्य आयोजनामुळे उष्माघात तसेच चेंगराचेंगरी झाल्याने निष्पाप १७ जणांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १६ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन या कार्यक्रमाची जबाबदारी असलेल्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी विविध सामाजिक संघटना, राजकिय पक्ष यांचेकडून करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी सनदी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एक सदस्यीय चौकशी समिती गठीत करुन एका महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश शासनाने दिनांक २० एप्रिल २०२३ रोजी दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी सनदी अधिकाऱ्या ऐवजी निवृत्त न्यायाधिशामार्फत करण्याबाबतची मागणी अनेक नागरिक, राजकिय पक्ष व प्रसार माध्यमांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दि. १६ एप्रिल, २०२३ रोजी आयोजित केलेल्या महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळयाचे शासकीय यंत्रणेने पूर्णत: नियोजन केलेले होते. तथापी, पुरस्कार प्रदान सोहळयांनंतर १४ अनुयायांचा दुर्दैवी मृत्यू झाला.
(२) हे खरे आहे.
(३) दिनांक २० एप्रिल, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये खारघर, जि.रायगड येथे "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार सोहळ्यानंतर झालेल्या या दुर्दैवी घटनेच्या संदर्भातील वस्तुस्थिती तपासण्याकरीता महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांची एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सद्यस्थितीत वस्तुस्थिती तपासणीची कार्यवाही सुरु आहे. समितीच्या विनंतीनुसार दिनांक १३ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुढील एक महिन्याकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे.
(४) हे खरे आहे.
(५) खारघर, जि.रायगड येथे "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार सोहळ्यानंतर झालेल्या या दुर्दैवी घटनेच्या संदर्भातील वस्तुस्थिती तपासणीची कार्यवाही एकसदस्यीय समितीमार्फत सुरु असून मृत्यू झालेल्या १४ व्यक्तिंच्या कुटुंबियांना प्रत्येकी रु.५.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु.७०.०० लक्ष इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून एक विशेष बाब म्हणून करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शासकीय आदिवासी वसतीगृहातील विद्यार्थी निर्वाह भत्त्यापासून वंचित असल्याबाबत**

**(२) * ६७१८९ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाकड-चिचंवड (जि.पुणे) येथे आदिवासी विकास विभागाअंतर्गत असलेल्या शासकीय वसतीगृहातील विद्यार्थ्यांना गत तीन महिन्यांपासून निर्वाह भत्त्याची (डीबीटीची) रक्कम मिळाली नसल्याने विदयार्थांनी दिनांक ३ मे, २०२३ पासून बेमुदत आंदोलन सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राळेगाव (जि.यवतमाळ) औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील वसतीगृहात राहणा-या आदिवासी विदयार्थांना प्रतिमाह रु.६०० आणि वसतीगृहाबाहेरील विदयार्थांना रु.५०० निर्वाह भत्ता देण्यात येत असून सन २०२१ ते २०२३ या कालावधीतील निर्वाह भत्ता देण्यात आला नसल्याचे दिनांक १५ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, निर्वाह भत्ता योजना ही ऑफलाईन असल्यामुळे मान्यता घेवून प्रदान करण्यास प्रक्रियेस अत्यंत विलंब लागत असल्याने काही ठिकाणी राखीव जागा रिक्त असतानाही विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी विद्यार्थ्यांना तात्काळ निर्वाह भत्त्याचे प्रदान करण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) हे खरे आहे.

वाकड-चिंचवड (जि.पुणे) या वसतीगृहातील १७६ प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी १०० विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्याची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा झाली होती व उर्वरित ७६ विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्याची रक्कम खात्यात जमा न झाल्यामुळे विद्यार्थ्यांनी दिनांक ३ मे, २०२३ पासून बेमुदत आंदोलन सुरु केले होते. त्यानंतर दि. १२ मे २०२३ रोजी उर्वरित ७६ विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्याची रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झालेली आहे. तदनंतर निर्वाह भत्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये राळेगांव (जि.यवतमाळ) येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ५१ विद्यार्थ्यांचे निर्वाह भत्यासाठीचे अर्ज प्राप्त झाले होते. व त्यातील सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आलेले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये निर्वाह भत्यासाठी ३८ अर्ज दाखल करण्यात आलेले आहेत. परंतू सदर अर्ज हे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्यामुळे विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्यात आलेला नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### भिवंडी (जि.ठाणे) महापालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींबाबत

**(३) * ६४७०७ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील वलपाडा परिसरातील वर्धमान इमारत कोसळून सहा जणांचा मृत्यु तर अनेकजण गंभीर जखमी झाल्याची दुर्घटना दिनांक २९ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील जमीन मालक श्री.इंद्रपाल पाटील याने गोदाम म्हणून सन २०११ मध्ये बांधलेल्या इमारतीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नियमांचे पालन न करता ग्रामपंचायतीच्या जुन्या परवानग्यांवर नंतर अधिकचे वाढीव अनधिकृत बांधकाम केल्यामुळे सदर घटना घडली, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, भिवंडीत गेल्या सहा वर्षात सात इमारती कोसळून ४६ जणांचा बळी गेला आहे तसेच प्रत्येक इमारत दुर्घटने नंतर पोलीस ठाण्यात पालिका अधिकारी बिल्डर यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात येऊनही ठोस कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भिवंडी महापालिका क्षेत्रात ११५१ इमारती धोकादायक स्थितीत असल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई उच्च न्यायालयाने भिवंडी तालुक्यातील बेकायदेशीर बांधण्यात आलेल्या हजारो गोदांमावर तातडीने कारवाई करावी असा आदेश देऊनही प्रशासनाने या बेकायदेशीर गोदांमावर कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) तसेच झालेल्या दुर्घटनेनंतर महसूल प्रशासनाने भिवंडी मधील हजारो बेकायदेशीर गोदांमाचे संरचनात्मक परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करण्याच्या सूचना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृतांना आर्थिक मदत, गोदाम व धोकादायक इमारतींचे संरचनात्मक परीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) करणे तसेच अनधिकृत बांधकामांवर कारवाई इ.संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

सदर दुर्घटनेमध्ये एकुण आठ व्यक्ती मयत व तेरा व्यक्ती जखमी झालेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

गेल्या सहा वर्षाच्या कालावधीमध्ये दोन इमारती कोसळून त्यामध्ये एकुण ४६ जणांचा मृत्यु झाल्याबाबत नारपोली पोलीस ठाणे येथे दाखल दोन्ही गुन्ह्यांमध्ये तपास पूर्ण करुन मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत.

(४) भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींबाबत पावसाळयापूर्वी करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने जून्या व जीर्ण झालेल्या अतिधोकादायक इमारतींचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून सर्वेक्षणाअंती एकूण २६७, सी-१ प्रवर्गातील अतिधोकादायक इमारती आढळल्या आहेत. सदर अतिधोकादायक इमारतींपैकी एकूण १८८ इमारतीचे पाणी व वीज पुरवठा खंडीत करुन रिकाम्या करणेची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून १२ इमारती निष्कासित करण्यात आल्या आहेत.

(५), (६) व (७) हे खरे नाही.

सदर घटनेबाबत दिनांक ३०/०४/२०२३ रोजी गुन्हा रजि. नं. नारपोली पोलीस स्टेशन, भिवंडी गु.र.क्र. ३७८/२०२३ भा.दं.वि. कलम ३०४ (२), ३३७, ३३८, ४२७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला अटक करुन त्याच्याविरुद्ध दिनांक १३/०६/२०२३ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सदर अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ८ व्यक्तीच्या नातेवाईकांना शासनाने प्रत्येकी ५ लाख रूपये आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

धोकादायक ईमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करणे व अनाधिकृत बांधकामावर कारवाई करण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्था व नियोजन प्राधिकारी यांचेकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांच्या अंगरक्षकाचा झालेला मृत्यु

**(४)** * **६६८९६ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील आनंद नगर भागात राहणाऱ्या सिव्हील इंजिनीअर यांनी सोशल मिडीयावर तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांच्या विरोधात दिनांक ५ एप्रिल २०२० रोजी वा त्यासुमारास आक्षेपार्ह पोस्ट टाकल्यामुळे संतप्त झालेल्या अंगरक्षक श्री.वैभव कदम यांच्या सह १५ ते २० समर्थकांनी करमुसे यांना तत्कालीन गृहनिर्माण मंत्री यांच्या बंगल्यावर नेऊन अमानुष मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.वैभव कदम यांच्यावर गंभीर आरोप असून या मारहाण प्रकरणी ठाणे पोलिसांकडून श्री.कदम यांची चौकशी सुरु असतानाच दिनांक २९ मार्च २०२३ रोजी वा त्यासुमारास त्यांचा निळजे ते तळोजा दरम्यान रेल्वे ट्रॅकवर संशयास्पद मृत्यू झाल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधीत दोषीं विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी वैभव कदम व इतर १४ असे एकूण १५ जणांविरुद्ध वर्तकनगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे दि.२२/०५/२०२३ रोजी गु.र.क्र.१२०/२०२० भा.दं.वि. कलम ३६४ (अ), ३६५, ३६७, ३४२, ३२४, ३२३, ५०४, ५०६ (२), १२० (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करून मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहेत.

(२), (३) व (४) होय.

सदर घटनेबाबत ठाणे रेल्वे पोलीस, ठाणे येथे अपमृत्यू क ८२/२०२३ कलम १७४ सी.आर.पी.सी. प्रमाणे नोंद करण्यात आली असून त्याबाबतचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाघोली (जि.पुणे) येथे गोदामाला लागलेल्या आगीत तीन व्यक्तींचा झालेला मृत्यु

**(५) * ६६७९१ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघोली (जि.पुणे) येथे मंडप आणि इव्हेंट मटेरियलच्या गोदामाला माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान अचानक लागलेल्या आगीत तीन जणांचा होरपळून मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात बहुतेक गोदामे अनधिकृत असून गोदाम बांधताना आजु बाजूला जागा सोडलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच सदर घटनेतील मृत व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

शुभ सजावट गोडाऊन, साई सत्यम पार्क, उबाळेनगर, वाघोली, जि.पुणे या गोदामाला दिनांक ०५.०५.२०२३ रोजी आग लागून सदर आगीमध्ये गोडाऊन मधील ३ कामगारांचा मृत्यू झाला आहे.

(२) या परिसरात साधारणपणे ६८ गोदामांचे प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असून, सदर गोदामे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्थापनेपूर्वी बांधण्यात आले असल्याचे दिसून येते. अनधिकृत गोदामांवर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ अन्वये कार्यवाही करण्याचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्रस्तावित आहे.

(३) शुभ सजावट गोडाऊनचे मालक यांनी सदर गोडाऊनमध्ये अग्नीशमन विभाग, विद्युत विभाग, बांधकाम विभाग, पोलीस विभाग यांच्या परवानगी न घेता, तसेच कामगारांच्या जिविताच्या रक्षणाकरिता कोणत्याही ठोस उपाययोजना न करता निष्काळजीपणा व हयगय केल्याने गोडाऊन मालकाविरोधात लोणीकंद पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३६४/२०२३, भा.दं.वि. कलम ३०४ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) दुर्घटनेमध्ये मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटूंबीयांनी कामगार न्यायालयात दाद मागितली आहे. त्याअनुषंगाने, मृत व्यक्तींच्या वारसांना भरपाई मिळणेकरिता कामगार उपायुक्त कार्यालय, पुणे यांना लोणीकंद पोलीस स्टेशनमार्फत गुन्ह्याचा प्रथम खबरी अहवाल, घटनास्थळ पंचनामा व साक्षीदारांच्या जबाबाच्या प्रती पाठविण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील रायम्स ॲन्ड रंबल प्ले ग्रुपमध्ये लहान मुलांना अमानुष मारहाण केल्याबाबत

**(६) * ६५४२९ श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांदिवली (पश्चिम) येथील रायम्स ॲन्ड रंबल प्ले ग्रुपमध्ये लहान मुलांना अमानुष मारहाण करणे, उचलून आपटणे व फरपटत नेणे असे प्रकार करणाऱ्या दोन शिक्षिकांविरोधात कांदिवली पोलीस ठाण्यात बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २०००) अंतर्गत माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती जीनल छेडा, श्रीमती मेघना जोशी, श्री.विराज उपाध्याय यांच्या मालकीच्या प्ले ग्रुपमध्ये श्रीमती जीनल छेडा व श्रीमती भक्ती शहा या दोन शिक्षिकांनी दिनांक १ जानेवारी २०२३ ते २७ मार्च २०२३ या काळात मुलांना मारहाण केली असल्याचे सी.सी. टी. व्ही मध्ये आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मारहाण करणाऱ्या शिक्षीकांना अद्यापही अटक करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर तसेच कर्तव्यात कसूर करणाऱ्या संबंधित पोलीस निरीक्षक यांच्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) रायम्स ॲन्ड रंबल प्ले ग्रुप येथील दोन शिक्षिकांनी मुलांना मारहाण करुन, क्रुर वागणूक दिल्या प्रकरणी कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई येथे दि.०२/०४/२०२३ रोजी गु.र.क्र. २११/२३, कलम २३ बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २००० व कलम ७५ बाल न्याय अधिनियम २०१५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील दोन आरोपी शिक्षिकांना २७/०४/२०२३ रोजी अटक करण्यात आली. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून आरोपी विरोधात दि.०१/०७/२०२३ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील स्व. इंदिरा गांधी स्मृती उप जिल्हा रूग्णालयातील कर्मचाऱ्याने केलेला हलगर्जीपणा

**(७) * ६८३९६ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील स्व.इंदिरा गांधी स्मृती उप जिल्हा रूग्णालयातील कर्मचाऱ्यांनी गर्भवती महिलेस रुग्णालयात दाखल न केल्याने त्या महिलेची जमिनीवर प्रसुती झाली असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रूग्णालयातील प्रसुती विभागातील कर्मचाऱ्याने केलेल्या हलगर्जीपणा संदर्भात महिलेच्या पतीने शांतिनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

सदर घटनेबाबत प्रसुत महिलेच्या पतीने तक्रार केली नसून अध्यक्ष, भिवंडी शहर जिल्हा काँग्रेस सेवादल सोशल मिडीया यांनी दिनांक १५/०२/२०२३ रोजी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, भिवंडी यांना तक्रार अर्ज केला होता.
(२) व (३) सदर प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाणे यांनी चौकशी केली असता, दि.१०/०२/२०२३ रोजी संबंधीत महिलेस डॉक्टरांनी स्व. इंदिरा गांधी स्मृती उप जिल्हा रूग्णालयामध्ये आंतररुग्न म्हणुन दाखल करुन घेतले होते. तथापि, महिलेची तातडीने प्रसुती करण्यासाठी तिचा पती आग्रही होता व पत्नीस वॉर्डच्या बाहेर बोलावत होता. त्यावेळी गरोदर महिलेला संबंधीत डॉक्टर व नर्सिंग स्टाफने बाहेर जाण्यास प्रतिबंध केला तरीही ती तिच्या पतीच्या मागे बाहेर व्हरांडयात गेली असता शारीरीक हालचालीमुळे तिची प्रसुती झाली व नर्सिंग स्टाफने तिला लगेचच उचलुन वॉर्डमध्ये नेल्याची बाब चौकशीत निष्पन्न झाली. सदर घटनेमध्ये हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा आढळून आलेला नाही.

तद्नंतर संबंधित महिला व तिच्या पतीकडे चौकशी केली असता त्यांनी कोणत्याही तक्रार नसल्याचे सांगितले.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मीरा रोड (जि.ठाणे) येथील लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या प्रियकराने प्रेयसीची केलेली हत्या**

**(८) * ६७५८६ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा रोड (जि.ठाणे) येथील लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या ५६ वर्षीय प्रियकराने प्रेयसीची निर्घृन हत्या केल्याचे दिनांक ४ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी वरिष्ठ निरीक्षक व पोलिस उपायुक्त, नयानगर यांनी हत्त्येचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरोपीला तात्काळ कठोर शिक्षा करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, दिनांक ०७/०६/२०२३ रोजी सदर घटना उघडकीस आलेली आहे.
(२) सदर घटनेबाबत दिनांक ०७/०६/२०२३ रोजी नया नगर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३०६/२०२३, भा.द.वि. कलम ३०२, २९७, २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) सदर गुन्ह्यात आरोपीस दिनांक ०७/०६/२०२३ रोजी अटक करण्यात आलेली असून सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील सहा मध्यम सिंचन प्रकल्प २५ वर्षानंतरही अपूर्ण असल्याबाबत**

**(९) * ६५४०१ श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ८५ कोटी रुपये खर्चाचे सहा मध्यम सिंचन प्रकल्प (आधळी, पिंपळगांव, पूर्णा, हरणघाट, सोंडयाटोला, वाघोलीबुटी) अनेक वर्षापासून अपुर्ण असल्याचे माहे मे, २०२३ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लेखा परिक्षणात देखील आक्षेप नोंदविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जलसंपदा विभागाने प्रकल्पासाठी पाण्याची उपलब्धता, जलआयोगाची मंजूरी, प्रकल्पाच्या आराखडयातील बदल, पुनर्वसनाचे प्रश्न आणि वारंवार घ्यावी लागणारी सुधारीत प्रशासकीय मान्यता इत्यादी कारणांमुळे प्रकल्पांचे काम प्रलंबित राहिल्याने शेतकऱ्यांची पाण्याअभावी गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्प तातडीने पुर्ण करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही तसेच दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

भारताचे नियंत्रक व लेखापरीक्षक यांचा भुपृष्ठ सिंचनातील परिणामावर निष्पादन लेखा परिक्षण अहवाल ३० डिंसेबर, २०२२ रोजी विधानमंडळात सादर करण्यात आला होता. सदर अहवालात पुढील प्रमाणे नमूद आहे :-

| | |
|---|---|
| पुर्ण झालेले प्रकल्प | ०४ प्रकल्प<br>आंधळी (सातारा), हरणघाट (चंद्रपूर),<br>सोंडयाटोला (भंडारा) आणि वाघोलीबुटी (चंद्रपूर) |
| प्रगतीपथावर असलेले प्रकल्प | ०२ प्रकल्प<br>पिंपळगांव (सोलापूर) व पूर्णा (अमरावती) |

(२) होय, हे खरे आहे. प्रकल्प पूर्ण करण्यास झालेला विलंब, किंमतीतील वाढ, अव्यवहार्य लाभ व्यय गुणोत्तर,सिंचनाचे उद्दिष्ट पुर्ण न होणे, अपुरी पाणी उपलब्धता, अपुरे व्यवस्थापन इ. बाबीवर लेखा परिक्षणात आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

(३) व (४) हे अशंत: खरे आहे.

१) पुर्णा मध्यम प्रकल्प, ता. चांदुर बाजार, जि. अमरावती
मुळ प्रशासकीय मान्यता - दिनांक ०६/०७/१९९२
प्रकल्पाची घळभरणी -सन २००७
सिंचन क्षेत्र - ७५३० हेक्टर
निर्मित सिंचन क्षेत्र -५४१७ हेक्टर

**पाणी उपलब्धता प्रमाणपत्र-** पुर्णा प्रकल्पास मुळ प्र.मा. ही सन १९९२ मधील नियोजन व जलविज्ञान कार्यालय अस्तीत्वात येण्यापुर्वीची असल्याने पाणी उपलब्धता प्रमाणपत्र घेतलेले नाही. प्रकल्पाच्या पाणी वापरास शासन निर्णय:- पाफेनि-२०२० / प्र.क्र. १२०/२० / मध्यम प्रकल्प दि १६/०३/२०२१ नुसार मान्यता प्राप्त झालेली आहे.

**सुप्रमा -** प्रकल्पाचा रु. ३६८.६३ कोटी किमंतीचा चतुर्थ सुप्रमा दि. ०६/०८/२०२१ ला मंजुर आहे.

**सद्यस्थिती :-** सदर प्रस्तावात नव्याने गणोजा बेलोरा ठिबक सिंचन योजना प्रस्तावित केलेली आहे. प्रकल्पावर नव्याने गणोजा बेलोरा ठिबक सिंचन योजनेंतर्गत २०९० हेक्टर क्षेत्रावर सिंचन निर्मितीचे काम प्रगतीपथावर आहे.

**२) वाघोली बुटी उपसा सिंचन योजना-**

मुळ प्रशासकीय मान्यता - दिनांक १०/११/१९९३, (रु.९५०.०० लक्ष)

प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण-सन २००६

सिंचन क्षेत्र - ४५४२ हेक्टर

निर्मित सिंचन क्षेत्र - २२४६ हेक्टर

**सुप्रमा -** तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता रु.५३२२.०० लक्ष किंमतीस, दि.०५.०३.२०१८ (दरसुची वर्ष २०१६-१७) अन्वये प्राप्त आहे.

**सद्यस्थिती :-** योजनेचे काम पुर्ण झाले असून प्रत्यक्ष सिंचन, सिंचन व्यवस्थापन विभागामार्फत सन २००६ पासून सूरु आहे.

**३) सोंड्याटोला उपसा सिंचन योजना :-** या योजनेचे सर्व काम पुर्ण झाले असुन या योजनेची ११०१० हे. संपुर्ण सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

**४) हरणघाट उपसा सिंचन योजना :-**

**मुळ प्रशासकीय मान्यता** - दि.०८/०२/१९९६ (रु.१२.१८ कोटी )

सिंचन क्षेत्र - ५८४२ हेक्टर

निर्मित सिंचन क्षेत्र - ४८२० हेक्टर

**सुप्रमा -** दि. ०७/०१/२००२ ला रुपये ४९.२० कोटी इतक्या किंमतीची प्रथम सुप्रमा प्राप्त झाली आहे

योजना कार्यान्वित सन २००८-०९

**सद्यस्थिती** :- योजनेचे काम पुर्ण असून सन २००८-०९ पासून योजना कार्यान्वित होऊन प्रत्यक्ष सिंचन सुरु आहे.

**५) आंधळी (सातारा ) मध्यम प्रकल्प :-**

**मुळ प्रशासकीय मान्यता** - दि.१४/०७/१९५६

प्रकल्प पुर्ण आहे .

सिंचन क्षेत्र - २३२२ हेक्टर

निर्मित सिंचन क्षेत्र - २२०९ हेक्टर

**सुप्रमा -**२६/०४/१९७७

**सद्यस्थिती** :- प्रकल्पाच्या उर्वरित कालव्याची व वितरण व्यवस्थेची कामे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या विरोधामुळे व झालेल्या नागरीकरणामुळे अपुर्ण आहे.

**६) पिंपळगांव ढाळे (सोलापूर ) :-**

**मुळ प्रशासकीय मान्यता** - सन १९८५ ( रु.४.३० कोटी )

सिंचन क्षेत्र - ३३८४ हेक्टर

निर्मित सिंचन क्षेत्र -१९१० हेक्टर

**चतुर्थ सुप्रमा -** प्रकल्पाची कालवा व वितरिकेची कामे पुर्ण करण्यासाठी रु.१४३.८५ कोटी किमतीचा चतुर्थ सुप्रमा प्रस्तावास मंजूरी देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. सदर मंजूरी प्राप्त झाल्यानंतर कालव्याचे उर्वरित कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बनावट शैक्षणिक प्रमाणपत्र बनविणाऱ्या टोळीला अटक करण्याबाबत**

**(१०) * ६४६३३ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे बनावट प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांची फसवणूक केली जात असल्याचे दिनांक ५ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगर येथे बनावट शैक्षणिक प्रमाणपत्र बनविणाऱ्या टोळीने महाराष्ट्र स्टेट ओपन स्कूल आणि ए-१ हिंद युनिव्हर्सिटी सारखी बनावट वेबसाईट बनवून सुमारे २७३९ विद्यार्थ्यांना बोगस प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी तीन व्यक्तींना पुणे पोलीसांनी अटक केल्याचे दिनांक ८ मे,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त टोळीने वेगवेगळी सहा विद्यापीठे व बोर्ड स्थापन करून प्रत्येक विद्यार्थ्याकडून प्रत्येकी ३५ ते ८० हजार रुपये घेऊन किमान १० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र स्टेट ओपन स्कूल व इतर दहा बोर्ड/विद्यापीठांच्या बनावट वेबसाईट बनवून प्रमाणपत्र दिल्याचे आढळून आले आहे. यामध्ये बनावट वेबसाईटवर एकूण २७३९ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र दिल्याची नोंद दिसून येत असून तपासामध्ये २३० विद्यार्थ्यांना बोगस प्रमाणपत्रे दिली असल्याचे निष्पन्न झाले आहे. यापैकी ४२ विद्यार्थ्यांच्या साक्षीमध्ये अद्यापपर्यंत ११.६८ लक्ष रुपयांची फसवणूक झाली असल्याची बाब तपासात निष्पन्न झाली आहे.

(४) सदर प्रकरणी स्वारगेट पोलीस स्टेशन येथै दिनांक ०१.०५.२०२३ रोजी गु.र.नं.१०७/२०२३ भा.दं.वि.कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, १९७, १९८, ४८२, ४८४, ३४ सह माहिती व तंत्रज्ञान अधिनियम, २००८ चे कलम ६५, ६६ (अ),(क),(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास पूर्ण करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपींविरुध्द दिनांक २८.०६.२०२३ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) भातसा कालव्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(११) * ६४९३२ श्री.दौलत दरोडा (शहापूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वासिंद (ता.शहापूर, जि.ठाणे) गावाजवळ भातसा कालवा फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले असून, मागील दोन महिन्यात तब्बल चार वेळा सदर कालवा फुटल्याचे दिनांक १८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)  असल्यास, भातसा कॅनेलच्या दुरुस्तीचे काम करताना आतून माती दगडाचे बांधकाम करुन त्यावर सिंमेट कॉंक्रिटचे निकृष्ट बांधकाम केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कालवा फुटल्याने प्रशासनाने सदर कालव्याला होणारा पाणीपुरवठा बंद केल्यामुळे त्यावर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भातसा धरण बांधल्यापासून एका कॅनेललाच पाणीपुरवठा सुरु असल्यामुळे शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाणी पुरवठा होत नसुन शेतकऱ्यांवर रोजंदारीवर काम करण्याची वेळ आली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कालवा दुरुस्ती तसेच सदर कालव्याचे व्यवस्थापन नियमितरित्या न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यासह, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि.०४/०१/२०२३ रोजी भातसा सिंचन आवर्तन चालू असतांना उजवा कालवा कि.मी. १५ मधील सा. क्र. १४/५७० मी. मधील पाईप मोरीच्या बांधकामातून गळती होऊन कालवा भराव खचल्याची व दि. १८/०४/२०२३ रोजी कि.मी. ३०.०० मधील सा. क्र. २९/२०० मी. येथील कालवा भराव खचल्याची घटना घडलेली आहे.
(२) नाही.

भातसा कालव्याच्या बांधकामास २५ ते ३० वर्ष झाले असून कालपरत्वे सदर कालवा जिर्ण व नादुरुस्त झालेला आहे.
(३) नाही.

दि. ०४/०१/२०२३ रोजी सिंचन आवर्तन सुरु असताना खचलेल्या कालवा भरावाची दुरुस्ती तातडीने करुन दि.०९/०१/२०२३ पासून सिंचन आवर्तन पूर्ववत करून सिंचन पाणी पुरवठा सुरळीत केला आहे. तसेच दि.१८/०४/२०२३ रोजीच्या घटनेमुळे सिंचन पाणी पुरवठ्यावर कोणताही विपरीत परिणाम झालेला नाही.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीचे कृषी व जलसंपदा विभागामार्फत पंचनामे करण्यात येऊन कृषी विभागामार्फत नुकसानीचा अहवाल प्राप्त करून प्रचलित शासन नियमांनुसार नुकसानभरपाई दि. १५/०२/२०२३ रोजी रक्कम रु.१,६६,५७१/- अदा करण्यात आलेला आहे.

दि. ०४/०१/२०२३ ते दि. ०९/०१/२०२३ दरम्यान सिंचन आवर्तनासाठी कालव्याद्वारे पाणी बंद असल्याने शेतीचे नुकसान झाल्याबाबत क्षेत्रिय कार्यालयाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) भातसा प्रकल्पाच्या सहाव्या प्रशासकिय मान्यतेनुसार भातसा उजवा तीर कालवा कि.मी. १ ते ५४ पर्यंत व भातसा डावा कालवा कि.मी. १ ते १७ पर्यत सिमीत करण्यात आलेला आहे. सध्यस्थितीत भातसा उजवा तीर मुख्य कालव्याचे काम पुर्ण झाले असून डावा तीर कालव्याचे कि.मी. २ पर्यंतचे काम पुर्ण झाले असून सदर लांबी मध्ये भातसा उजवा व डावा तीर कालव्याद्वारे एकुण ७४६६ हे. क्षेत्र सिंचन क्षमता निर्मित करण्यात आली आहे. डावा तीर कालव्याचे उर्वरीत लांबी मधील काम वन विभागाच्या व इतर  आवश्यक मान्यता घेवून सक्षम स्तरावर मान्यता घेवून करण्याचे नियोजन आहे.
(५) चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

क्षतिग्रस्त कालव्याची तातडीने दुरुस्ती करून सिंचन पाणी पुरवठा सुरळीत करून सिंचन आवर्तन पूर्ण केले आहे. तसेच कालव्याची नियमित देखभाल दुरुस्तीची कामे आवश्यकतेनुसार सिंचन व बिगर सिंचन प्रापणसूचीद्वारे हाती घेण्यात येत असून कि.मी. १० ते २३ मध्ये अस्तरीकरण व पाईप मोऱ्यांची दुरुस्ती करणेकामी सन २०२३-२४ च्या प्रापणसुची मध्ये प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. संपूर्ण कालव्याची दुरुस्ती चार टप्प्यात करण्याचे नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरगाव (ता. शहापूर, जि.ठाणे) येथे जांभे लघुपाटबंधारे योजनेतून बांधण्यात आलेल्या उजव्या आणि डाव्या कालव्याला लागलेली गळती थांबविण्याबाबत

**(१२) * ६७०२३ श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरगांव (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे जांभे लघुपाटबंधारे योजनेतून बांधण्यात आलेल्या उजव्या आणि डाव्या कालव्याला गळती लागल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्यातील गळती तसेच तेथील पाणी पुरवठा योजनेतील गैरव्यवहारामुळे स्थानिकांना नाहक त्रास होत असून मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पाणी गळतीमुळे कालव्यासाठी करण्यात आलेला संपूर्ण खर्च वाया गेला असून, नागरिकांना योजनेचा कोणताही लाभ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कालव्याची गळती रोखणे तसेच पाणीपुरवठा योजनेतील गैरव्यवहारातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

(२) हे खरे नाही.

सदर कालव्यामध्ये कोठेही गळती नाही. तसेच सदर योजना ही सिंचन योजना असून या योजनेतून कोणतीही पाणी पुरवठा योजना अस्तित्वात नाही. त्यामुळे पाणी पुरवठा योजनेतील गैरव्यवहाराबाबत प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिमुर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील राष्ट्रसंत तुकडोजी नागरी सहकारी पतसंस्थेत झालेला गैरव्यवहार

**(१३) * ६७२४८ श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमुर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील राष्ट्रसंत तुकडोजी नागरी सहकारी पतसंस्थेत सात कोटी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी पोलीस स्टेशनला दिली असता १९ महिन्यांनी आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आले असुन अद्याप आरोपींना अटक झालेली नसल्याने संस्थेचे खातेदार व अन्याय निवारण समिती साखळी उपोषणाला बसले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून तपास मोहीम अतिशय संथ गतीने सुरु असल्याने आंदोलक उपोषण सोडण्यास तयार नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती करवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राष्ट्रसंत तुकडोजी नागरी सहकारी पतसंस्थेमध्ये अंदाजे रु. ७.६६ कोटी इतक्या रकमेचा आर्थिक गैरव्यवहार झाल्याची पतसंस्थेचे मानद सचिव यांनी पोलीस स्टेशन, चिमूर येथे दिनांक १२.०२.२०१९ रोजी तक्रार दाखल केली आहे.

(२) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, प्राथमिक चौकशी मध्ये लेखा परिक्षण करण्याकरिता उप लेखापरीक्षक, सहकारी संस्था, चिमुर यांना कळविण्यात आले होते. तदनंतर, सदर लेखापरिक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत उपलेखापरिक्षक, चिमुर यांनी दिनांक २२.११.२०२२ रोजी अहवाल सादर करून पोलीस स्टेशन चिमुर, जिल्हा चंद्रपूर येथे तक्रार दाखल केली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने, दिनांक २२.११.२०२२ रोजी पोलीस स्टेशन चिमुर, जिल्हा चंद्रपूर येथे अपराध क्रमांक ३१९/२०२२, कलम ४०६, ४०८, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७७(अ), १२०(ब), २०१, ३४ भादंवि सहकलम ३ महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय आस्थापनामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर संस्थेचे खातेदार व अन्याय निवारण समिती यांनी आरोपींना त्वरीत अटक व्हावी याकरिता तहसील कार्यालय, चिमुर येथे दिनांक २६.०४.२०२३ रोजी साखळी उपोषण केले होते.

(३) व (४) नाही.

गुन्ह्याची व्याप्ती लक्षात घेऊन सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांचेकडे वर्ग करण्यात आला असून प्राप्त पुराव्यांच्या आधारे आरोपींना दि.१९.०५.२०२३ रोजी अटक करण्यात आली असल्याने संस्थेचे खातेदार व अन्याय निवारण समिती यांनी त्याचदिवशी साखळी उपोषण समाप्त केले आहे. प्रस्तुत प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

(५)प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई पोलिस दलातील भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(१४) * ६५२२२ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस दलातील रिक्त ७ हजार ७८ जागांसाठी दिनांक ७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेत हायटेक कॉपी तसेच अनेक गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या लेखी परीक्षेत उमेदवारांनी बटण कॅमेऱ्याच्या सहाय्याने प्रश्नपत्रिकांचे फोटो काढून ते ई-मेलद्वारे बाहेर पाठवून त्याची मायक्रो ब्ल्यूटूथद्वारे बाहेरुन उत्तरे घेवून पेपर सोडविले व यासाठी एका उमेदवाराकडून सुमारे १० लाख रुपये घेण्यात आल्याचा आरोप स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई पोलिस दलात झालेल्या भरती प्रक्रियेतील गैरप्रकारांची चौकशी विशेष पथकामार्फत करण्यात यावी, अशी मागणी विरोधी पक्ष नेता (परिषद) यांनी राज्याच्या पोलिस महासंचालकांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू परिक्षा पुन्हा घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मुंबई पोलीस दलांतर्गत पोलीस शिपाई पदाच्या ७०७६ व पोलीस शिपाई चालक पदाच्या ९९४ अशा एकूण ८०७० पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. या भरती प्रक्रियेत मैदानी चाचणीनंतर घेण्यात आलेल्या लेखीपरीक्षेदरम्यान काही उमेदवारांनी बटण/पेन कॅमेऱ्याच्या सहाय्याने प्रश्नपत्रिका ई-मेलद्वारे परीक्षाकेंद्राच्या बाहेर पाठवून बाहेरील इसमांच्या मदतीने प्रश्नांची उत्तरे ब्ल्युटूथद्वारे मिळवून तंत्रज्ञानाच्याद्वारे कॉपी करून गैरप्रकार केल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) व (४) होय. मा.विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानपरिषद यांनी परीक्षेदरम्यान झालेल्या गैरप्रकाराबाबत चौकशी करण्याबाबत पत्र पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना दिलेले असून, याप्रकरणी पोलीस उपआयुक्त (मुख्यालय-२) यांचेकडून कार्यवाही सुरू आहे. लेखी परीक्षेदरम्यान केलेल्या गैरप्रकार प्रकरणी एकूण ११४ संशयीतांविरुध्द पुरावे निष्पन्न झाले असून, यापैकी ८८ आरोपी उमेदवार असून २६ आरोपी उमेदवारांना सहाय्य करणाऱ्या इतर व्यक्ती आहेत. याप्रकरणी, मुंबईतील वेगवेगळया पोलीस ठाण्यांतर्गत एकूण ६ गुन्हे दाखल करण्यात आले असून निष्पन्न झालेल्या एकूण ११४ आरोपींपैकी ३९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. यापैकी २७ आरोपींना जामिन मिळालेला असून १२ आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. याप्रकरणी, पुढील पोलीस तपास सुरु असून निष्पन्न आरोपींपैकी जे आरोपी अंतिम गुणवत्ता व प्रतिक्षा यादीत असल्याचे आढळले आहे, अशा उमेदवारांना अपात्र ठरवून यादीतून वगळण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर येथे एका महिलेवर सामूहिक अत्याचार करुन हत्या केल्याबाबत**

**(१५) * ६६१९७ श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील जुन्या बीड बायपास रस्त्याने चिकलठाणे येथील घरी जात असलेल्या एका महिलेवर विमानतळ परिसरात तीन नराधमांनी सामूहिक अत्याचार करुन तीची दगडाने ठेचून निर्घृण हत्या केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात आहे,

(३) असल्यास, अशा स्वरुपाच्या घटना राज्यात सतत घडत असल्याने या गुन्हयांना आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) एमआयडीसी सिडको पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर येथे ३२ वर्षीय महिलेवर अत्याचार करुन तिचा दगडाने ठेचून खून केल्याप्रकरणी ३ आरोपीविरुध्द गु. र. क्र. १७०/२०२३, भारतीय दंड विधान संहिता कलम, ३०२, ३७६ (ड), ३९७, ३४१, २०१, ३४ अन्वये दिनांक ०३.०४.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ३ आरोपीस दिनांक ०३.०४.२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींविरुध्द दोषारोप क्र. ९५/२०२३ अन्वये मा. न्यायालयात दिनांक २६.०६.२०२३ रोजी दोषारोप दाखल करण्यात आले आहेत.

(३) राज्यात महिला अत्याचाराच्या घटनांना प्रतिबंध करण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१. महिलांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी राज्यात महिला सहाय्यता कक्ष, महिला सुरक्षा समिती (जिल्हा स्तरावर), हुंडाबळीस प्रतिबंधासाठी महिला जिल्हा सल्लागार समिती, विशेष जलदगती न्यायालये, महिला छेडछाड विरोधी पथके, विशाखा समिती, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, महिला पोलीस कक्ष, पोलीस काका, पोलीस दिदी, महिला सुरक्षिततेसाठी बडीकॉप, राज्यातील लैंगिक अत्याचाराची माहिती तात्काळ उपलब्ध होण्यासाठी "Investigation Tracking System For Sexual Offences" ही ऑनलाईन पोर्टल सेवा इ. उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

२. महिलांवरील गंभीर गुन्ह्याच्या तपासाबाबत नियमितपणे कार्यपध्दती व मार्गदर्शक सूचना वितरीत करण्यात आल्या आहेत. गुन्हा दाखल केल्यापासून निर्गती करेपर्यंत म्हणजेच दोषारोप सादर करेपर्यंत कशाप्रकारे अंमलबजावणी करावी याकरीता मानक कार्यप्रणाली (एसओपी) जारी केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खरेदीदारांना विहित वेळेत सदनिकांचा ताबा न देणाऱ्या विकासकांच्या प्रकल्पांच्या जप्तीचे महारेराने दिलेले आदेश

**(१६) * ६४८९४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरेदीदारांना सदनिकांचा ताबा विहित वेळेत देऊ न शकलेल्या राज्यातील १००७ विकासकांच्या ६२४ कोटींच्या प्रकल्पांना जप्तीचे आदेश महारेराने दिल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक जिल्हा प्रशासनाच्या दिरंगाईमुळे ६२४ कोटी रुपयांपैकी केवळ १०५ कोटी रुपयांची वसुली झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रक्कम वसूल करुन खरेदीदारांना सदनिका अथवा परतावा देण्याबाबत जिल्हा प्रशासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे :** (१), (२), (३) व (४) खरेदीदारांना सदनिकांचा ताबा विहित वेळेत देऊ न शकल्याने माहे मे, २०२३ अखेर महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडून १००७ महसूल वसूली प्रमाणपत्रे जारी केली आहेत. त्यापोटी रु.६२४ कोटी एवढी रक्कम वसूल करणे आवश्यक असून त्यापैकी रु. १०५ कोटी एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडून महसूल वसूली प्रमाणपत्र प्राप्त झाल्यावर जिल्हा प्रशासनातर्फे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ तसेच महाराष्ट्र जमीन महसूलाच्या वसूलीबाबत नियम, १९६७ मधील तरतुदीनुसार संबंधीतांना नोटीस देणे, जप्ती करणे, त्यांच्या मालमत्तेचा लिलाव करणे इत्यादी प्रकारची वसुली करिता कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील म्हाडाच्या इमारतींची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(१७) * ६४७४९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनरर्चना मंडळाकडून जवळपास ५० वर्षापूर्वी पाडण्यात आलेली मौलाना आझाद रोड, भंडार वाडा, क्रॉस लेन, गिरगाव येथील इमारत खाजगी कंत्राटदार नेमून म्हाडाने नव्याने बांधली असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सायन येथील प्रतिक्षा नगर मध्ये संक्रमण शिबिरात गेली ५० वर्ष राहणाऱ्या प्रकल्पातील रहिवाश्यांना अद्याप हक्काचे घर मिळाले नसून याउलट नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीच्या डागडुजीसाठी नव्याने ३० लाख रुपये खर्च करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारतीमधील रहिवासी वर्गाने म्हाडाकडे आपली मूळ कागदपत्रे जमा केली असुन देखील अनेक वर्ष होऊनही रहिवाश्यांना आजही संक्रमण शिबिरात राहावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रहिवाश्यांना तातडीने घरे मिळण्यासंदर्भात तसेच निकृष्ट दर्जाचे काम करण्याऱ्या कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) म्हाडा अधिनियम १९७६ कलम ९१ अंतर्गत इमारत क्र. ३४६-३४९, ३५२, १-३-५ भंडारवाडा या इमारतीचे भूसंपादन ताबा दि.२६.०७.२००४ रोजी व मालमत्तेच्या पुर्नबांधणी करीता कंत्राटदार यांना दि.३०.०६.२००८ रोजी कार्यादेश देण्यात आले. तथापि, विषयांकित इमारतीच्या जागेवर जुने १ वीजकेंद्रामुळे (इलेक्ट्रिकल सबस्टेशन) इमारतीच्या जिन्याचे काम रखडले होते. दि.२८.०४.२०११ रोजी सबस्टेशन स्थलांतरीत करण्यात आले होते. तसेच सदरहू मालमत्तेतील ०२ अनिवासी भाडेकरू/रहिवाशी यांनी पुर्नबांधणीच्या कामास विरोध केला होता.

तदनंतर पुर्नबांधणीचे काम सुरु असताना ठेकेदाराचा सन २०१७ मध्ये मृत्यु झाला. संबंधित कंत्राटदाराच्या कंपनीकडुन रखडलेले काम सुरु करण्याबाबत प्रतिसाद प्राप्त न झाल्याने इमारतीचे काम इतर ठेकेदार नेमून भौतिक दृष्टया पूर्ण करण्यात आले आहे व त्यास महानगरपालिकेतर्फे दि. २४.०९.२०२० रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे.

(२) उपरोक्त कारणांमुळे सदरहू प्रकल्पास झालेल्या विलंबामुळे भाडेकरु / रहिवाशी यांना उत्तम सुविधा देण्याकरिता काही पायाभुत सुविधा व इमारतीतील जीर्ण झालेल्या भागाचे किरकोळ कामांकरिता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

(३) दुर्गादेवी सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) येथील एकूण ४४ भाडेकरु/रहिवाश्यांपैकी ३५ भाडेकरु / रहिवाशांनी मंडळाकडे कागदपत्रे जमा केली होती. त्यामध्ये ३४ भाडेकरु / रहिवाशी यांना देकारपत्र देण्यात आले आहे. उर्वरित १ भाडेकरु / रहिवाशी यांचे नाव सोडतीमध्ये नसल्यामुळे त्यांना देकारपत्र देण्यात आले नाही.

कागदपत्रे सादर केलेल्या तसेच देकारपत्र देण्यात आलेल्या ३४ भाडेकरु / रहिवाश्यांपैकी ६ भाडेकरु /रहिवाश्यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यामुळे, पुनर्रचित गाळयांचा ताबा देण्यात आला आहे.

उर्वरित २८ भाडेकरु / रहिवाश्यांपैकी १२ प्रकरणे ही खरेदी विक्रीची असून, त्याबाबतचे नोंदणीकृत खरेदीखत सादर न केल्याने व उर्वरित १६ प्रकरणे ही वारसाहक्काची असल्याने वारसाहक्क प्रमाणपत्र / नोंदणीकृत हक्कसोड प्रमाणपत्र सादर न केल्याने त्यांना मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत ताबा देणे शक्य झालेले नाही. संबंधित भाडेकरु/रहिवाशी यांना वारसा प्रमाणपत्र/ नोंदणीकृत खरेदी विक्री करारनामा सादर करण्याबाबत मंडळाकडून बैठक घेवून निर्देश दिले असुन कागदपत्रांची पुर्तता करुन घेण्याबाबत मंडळाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर व ठाणे जिल्ह्यातील आदिवासींना वनपट्ट्यांचे हक्क मिळण्याबाबत**

**(१८) * ६५२५६ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले**

**(साकोली), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात वन हक्क कायद्याची योग्य अंमलबजावणीकरिता तसेच वन पट्टयांचे हक्क मिळण्याकरिता आदिवासींनी केलेल्या आंदोलनाला आश्वासन देवूनही त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे आदिवासींनी दिनांक २१ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वनपट्टयातील जमिनधारकांना दाव्याचे कमी क्षेत्र मंजुर करण्याबाबत उपविभागीय अधिकारी, डहाणू यांच्या आदेशाविरुध्द दावेदारांनी जिल्हाधिकारी यांचेकडे केलेल्या अपिलानुसार जिल्हाधिकाऱ्यांच्या ताब्यात असलेले पूर्ण क्षेत्र मंजूर करावे अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी शासनाकडे केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात ठाणे जिल्ह्यातील प्रलंबित वनदावे मंजूर करण्याकरिता आदिवासींच्या घरकुलावर वन विभागाकडून तोडण्याची कारवाई थांबवावी तसेच वनपट्टयात वीज व बोरींग मिळावी या मागण्यासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आदिवासींनी आंदोलन केले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाच्या अनुसूचित जमाती व अन्य पारंपारिक वन हक्काची मान्यता कायद्याप्रमाणे आदिवासी व बिगर आदिवासी दावेदारांना वनहक्काची जमीन मिळणे अपेक्षित असतानाही चारही उपविभागांमध्ये वन हक्क दावेदार यापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, या प्रकरणांची शासनाने चौकशी करुन वन पट्टयांचे हक्क देणे, घरकुलांवरील कारवाई थांबविणेसह विविध सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१) जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांच्या कार्यालयासमोर दि.२२.०५.२०२३ पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्याबाबत कष्टकरी संघटना यांचे दि.०९.०५.२०२३ रोजीचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांना प्राप्त झाले होते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

श्रमजिवी संघटना, महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे कार्यालयावर दि.२३.०५.२०२३ रोजी आंदोलन केले होते.

(४) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यांत ठाणे, कल्याण, भिवंडी व उल्हासनगर या ४ उपविभाग मिळून वैयक्तिक वनहक्कासाठी एकुण १७१५७ दावे प्राप्त झाले असुन, त्यापैकी १५२२४ दावे निकाली काढणेत आले आहेत. निकाली काढलेल्या दाव्यांपैकी ६४३७ दावे मंजुर करणेत आले असुन, ८७८७ दावे नामंजुर करणेत आले आहेत. उर्वरीत १९३३ दावे जिल्ह्यांत प्रलंबित आहेत.

(५) अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६ व नियम २००८ तसेच सुधारित नियम २०१२ अंतर्गत वनजमिनीची वैयक्तिक वनहक्क प्रलंबित असतांना दावेदारांची अतिक्रमण निष्कासित न करण्यासंदर्भात महसुल व वन विभागाने दि.२८.११.२०२२ रोजी शासन परिपत्रक निर्गमित केलेले आहे.

महसूल व वन विभागाच्या दि.२०.०६.२०२३ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये, उक्त अधिनियमातंर्गत वनपट्टेधारकांना मंजूर वनपट्टयामध्ये विहीर बांधण्यास मान्यता देण्यात आली आहे.

उक्त अधिनियमाच्या नियम १६ तसेच, महसुल व वन विभागाच्या दि.०२.११.२०१६ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये, वैयक्तिक वनहक्क धारकास त्यास प्राप्त झालेल्या टायटल्सच्या आधारावर बँकाकडून मिळणारी कर्जे तसेच इतर शासकीय योजनां अंतर्गत प्राप्त होणा-या लाभासाठी पात्र राहतील असे नमुद केलेले आहे. त्यानुसार ठाणे जिल्ह्यातील पात्र वनहक्क धारकांना विविध योजनांचा लाभ देण्यात आला आहे.

वनविभागाकडून मंजूर वनपट्यातील घरकूल योजनेंतर्गत मंजुर घरकुलांवर कोणत्याही स्वरुपाची कारवाई केल्याचे दिसुन येत नसल्याचे वनविभागाच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या अहवालात नमुद केलेले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लालबाग (मुंबई) येथील श्री यशमंगल को.ऑ.हौ.सो या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत**

**(१९) * ६६०२२ श्री.महेंद्र दळवी (अलिबाग), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), अॅड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लालबाग (मुंबई) येथील श्री यशोमंगल को. ऑप. गृहनिर्माण सोसायटी (जूनी बदानी बोहरी चाळ), गोदरेज कंपाऊंड, गॅस लेन या इमारतीचा म्हाडा प्रशासनाने ३३/७ नियमाअंतर्गत पुनर्विकास केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीतील ६४ रिक्त गाळे संक्रमण शिबीर म्हणून देण्याबाबतचा ठराव क्र.७०६५, दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी पारीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नोंदणीकृत इमारतीचे अशा पध्दतीने संक्रमण शिबीर करण्यास यशोमंगल सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्व रहिवाशांनी त्या ठरावास तीव्र विरोध करुन दिनांक ५ जून, २०२३ पासून साखळी उपोषण सुरु करुन यासंदर्भातील निवेदन लोकप्रतिनिधीमार्फत मा.उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री यांचेकडे दिनांक १६ जून, २०२३ रोजी वा त्यादरम्यान सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर इमारतीतील अधिकच्या खोल्या या अल्प उत्पन्नधारक घटकातील नागरिकांना विकण्यात येतील अशी म्हाडा प्रशासन व विकासक यांच्यात झालेल्या करारामध्ये नोंद असूनही म्हाडा प्रशासनाने इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र (ओ.सी.) नसतानाही या अतिरिक्त गाळ्यांना बेकायदेशीररित्या संक्रमण शिबीर म्हणून घोषित करून पोलीस संरक्षणामध्ये त्यांचे वाटप केल्याचे दिनांक २४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेकायदेशीररित्या घोषित केलेले संक्रमण शिबीर रद्द करुन अधिकच्या खोल्या या अल्प उत्पन्नधारक घटकातील नागरिकांना विकण्याबाबत कोणती कार्यवाही कली तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) , (२) व (३) होय, हे खरे आहे,
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी म्हाडा स्वत: विकासक असुन कंत्राटदाराची नेमणूक करुन इमारतीची पुर्नबांधणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा ठराव क्र.७०६५ अन्वये या इमारतीतील अतिरिक्त गाळयांचा वापर ना.म.जोशी मार्ग बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पामधील रहिवाशांकरीता संक्रमण गाळे म्हणुन वापर करण्यास अनुज्ञेय करण्यात आले आहे. सदर इमारतीस दि.२९.०५.२०२३ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

सदरहू गाळयांचा संक्रमण गाळे म्हणून होणाऱ्या वापरास इमारतीतील मुळ स्थानिक रहिवाश्यांचा विरोध असल्यामुळे पोलीस बंदोबस्तात बीडीडी रहिवाश्यांच्या केवळ सामानाचे स्थलांतरण करण्यात आले. तथापि, स्थानिक रहिवाश्यांचा विरोध विचारात घेऊन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून सदर गाळयांचे संक्रमण शिबीर म्हणुन केलेले वाटप रद्द केले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वर्तकनगर (जि.ठाणे) येथील सुस्थितीत असणाऱ्या**
**इमारती धोकादायक ठरवल्याबाबत**

**(२०) * ६५४५३ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्तकनगर (जि.ठाणे) येथे सुस्थितीत असणाऱ्या इमारती धोकादायक ठरवून १६० कुटुंबाना बेघर करुन, विकासकाच्या फायदयासाठी म्हाडाच्या नियमांचे उल्लंघन करुन रहिवाशांची फसवणूक गैरव्यवहार करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र नगर येथील १८ इमारती धोकादायक ठरवून त्यांचे पुनर्निर्माण करण्यासाठी इमारती पाडून विकासकाने रहिवाशांना मागील एक वर्षापासून भाडे देणे बंद केले असून उक्त भूखंडावर विकासकाने २८० कोटी रुपयांचे कर्ज घेतले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) वर्तकनगर, ठाणे येथील म्हाडाच्या वसाहतीतील इमारत क्र.४५ व ४७ येथील आदर्श अपनाघर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील काही सभासदांनी ४५.०० चौ.मी. क्षेत्रफळाच्या सदनिकांच्या ऐवजी सोसायटी कमिटी आणि विकासक यांनी संगनमताने ३९.९५ चौ.मी. क्षेत्रफळाच्या सदनिका देत असल्याची तक्रार म्हाडा कार्यालयास केली असून म्हाडाने इमारतीच्या पुनर्विकासास कोणत्याही प्रकारची संमती देवू नये असे कळविले आहे.
(२) प्रस्तावित ठिकाणी एकत्रित पुनर्विकासाचा प्रस्ताव सन २०१५ मध्ये म्हाडा कार्यालयात सादर करण्यात आला होता. त्याबाबत म्हाडा कार्यालयाने छाननी करून काही अटी व शर्तींच्या अधिन राहून त्यास तत्वत: मंजुरी दिलेली आहे. ठाणे महानगरपालिकेच्या दि.३०/०५/२०१८ रोजीच्या पत्रामध्ये सदर इमारती अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याचे नमूद केले आहे. तसेच विकासकाने उक्त भूखंडावर कर्ज घेतल्याची बाब व विकासकाने रहिवाशांना भाडे देणे बंद केल्याबाबत कोणतीही तक्रार म्हाडास प्राप्त झालेली नाही. याबाबत मुख्य दक्षता अधिकारी, म्हाडा यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाने केलेली वीजदरवाढ मागे घेण्याबाबत**

**(२१) * ६४५६६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव-कवठेमहांकाळ), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.रोहित पवार (कर्जत**

**जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.संग्राम थोपटे (भोर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य वीज नियामक आयोगाने माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान महावितरणला वीजदरवाढ करण्यास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीजदरवाढीमुळे सर्वसाधारण वीज ग्राहकांच्या वीजदरात सरासरी २१.६५ टक्के वाढ होणार असून दिनांक १ एप्रिल, २०२३ पासून वर्ष २०२३-२४ मध्ये वीज दरात २.९ टक्के व वर्ष २०२४-२५ मध्ये ५.६ टक्के वीज दरवाढ लागू करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतीसाठी वीजपुरवठा करण्यात येत असलेल्या अडचणी विचारांत घेऊन, शेतकऱ्यांसाठी “स्वतंत्र कृषी वीजपुरवठा कंपनी” सुरु करण्याचा पर्याय शासनाने विचारात घ्यावा तसेंच कृषी दराचा फेरविचार करावा, असे वीज नियामक आयोगाने शासनास सुचविले असल्याचे दिनांक २ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तदनुसार वीज ग्राहकांना वीजवापरासाठी १६ ते २६ टक्के अधिक भार सहन करावा लागणार असून यामुळे अनेक उद्योग धंद्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वीज दरवाढ रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी २.९% व आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ५.६% वाढ मंजूर केली आहे.

(३) हे खरे आहे.

मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने कृषी ग्राहकांसाठी नवीन कंपनी स्थापन करावी असे सुचविले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### छत्रपती संभाजीनगर शहरातील किराडपूरा भागात घडलेल्या दंगलीबाबत

**(२२) * ६६०१९ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर शहरातील किराडपुरा भागात दंगल घडून जाळपोळ, वाहनांची तोडफोड तसेच हिंसाचार झाल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक शांतता व सलोखा बिघडवण्याच्या दृष्टीने ही दंगल पूर्वनियोजित कट असल्याचा आरोप काही लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी केला आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने विशेष चौकशी समिती नेमून कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी चौकशीकरीता एका विशेष पथकाची स्थापना केली असून जिन्सी पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर येथे गु.र.क्र. ९३/२०२२ अंतर्गत भारतीय दंड संहिता कलम १२० ब, १४३, १४७, १४८, १४९, १५१, १५२, १५३, २९५, ३०७, ३३२, ३३३, ३३६, ३५३, ४३५ सह कलम ३ व ४ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४, सहकलम ७ फौजदारी कायदा, सहकलम १३५, १४० महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### महानिर्मितीने ओडिसा येथील महानदी कोल्डफिल्डच्या खाणीतून जादा दराने कोळसा खरेदी केल्याबाबत

**(२३) * ६५२२५ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पावसाळयात कोळशाच्या खाणीत पाणी शिरल्याने कोळशाचा तुटवडा निर्माण होत असल्याचे कारण दर्शवून महानिर्मितीने ओडिसा येथील महानदी कोल्डफिल्डच्या खाणीतून रु.१५०० प्रतिटन असणारा ३ लाख २० हजार मेट्रीक टन कोळसा रु.३१२५ या दराने खरेदी करण्याचा निर्णय दिनांक २० मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयामुळे तब्बल १०० कोटीचा अतिरिक्त भार महानिर्मितीवर येणार असल्याने त्याचा परिणाम वीज दर वाढीवर होऊन ग्राहकांवर त्याचा आर्थिक भार येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

आर्थिक वर्ष २०२२-२३ या काळामध्ये देशी कोळशाची (Domestic Coal) उपलब्धता कमी झाल्यामुळे उद्भवलेली कोळशाची कमतरता भरून काढण्यासाठी कोळसा मंत्रालयाने (MoC) देशी कोळश्यासोबत आयात केलेल्या

कोळसा (Import Coal) १०% मिश्रित करून वापरण्याचे निर्देश दिले होते. चालु आर्थिक वर्षातही देशी कोळश्यासोबत आयात केलेल्या कोळसा (Import Coal) ६% मिश्रित करून वापरण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे उद्भवणारी देशी कोळशाची कमतरता भरून काढण्यासाठी उर्जा मंत्रालयाने (MoP) दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कोळसा मंत्रालय (MoC), रेल्वे, शिपिंग कार्पोरेशन ऑफ इंडिया (SCI) आणि केंद्रीय विद्युत प्राधिकरण (CEA) भारत सरकार (GoI) यांच्याशी सल्लामसलत करून महानदी कोलफील्ड खाणीतील कोळसा रेल्वे-समुद्र-रेल्वे (Rail Sea Rail [RSR]) मार्गे वाहतूक करून देशाच्या पश्चिम भागातील औष्णीक विद्यूत केंद्रांमध्ये (औ.वि.कें.) वापरण्याचे निर्देश दिले होते. यानुसार महानदी कोलफील्ड खाणीतून ३ लाख २० हजार मेट्रिक टन सुमारे रु.१७५० प्रती मे. टन या दराने (G१२ ग्रेडचा) कोळसा खरेदी केला आहे.

(२) वाहतुकीच्या खर्च रु.३१२५ प्रती मे. टन या दराने असल्याने साधारणत: रु.६९.६७ कोटीचा अतिरिक्त भार महानिर्मितीला द्यावा लागणार आहे.

कोळशाची प्रती उष्मांक किंमत कमीत कमी राहील यासाठी महानदी कोलफील्ड खाणीतून चांगल्या प्रतीचा कोळसा मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतो. तसेच सदर कोळसा हा कमी दराच्या कोळशासोबत मिश्रण करुन वापरण्यात येतो जेणेकरुन वीजनिर्मिती खर्च कमीत कमी राहील व महाराष्ट्रातील वीज ग्राहकांना कमीत कमी दरात वीज उपलब्ध होईल.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील महालक्ष्मी नर्सिंग होम या संस्थेने नवजात बाळाची विक्री केल्याबाबत**

**(२४) * ६५५१२ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर येथील नोंदणी रद्द झालेली असतानाही अनधिकृतपणे नर्सिंग होम सुरू ठेवणाऱ्या महालक्ष्मी नर्सिंग होमच्या डॉ. चित्रा चैनानी यांनी सात लाख रुपयांत केवळ २२ दिवसांच्या बाळाची विक्री केली असल्याचे दिनांक १९ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाचे धागेदोरे थेट नाशिक, बेळगाव पर्यंत असून यात पाच व्यक्तींना अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित डॉक्टरांविरुध्द यापूर्वी देखील बाळ विक्री केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

सदर घटनेबाबत मध्यवर्ती पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु.र.नं. ३२८/२०२३ भा.दं.वि. कलम ३७०, ३४, १२० (ब) सह बालन्याय (बालकांची काळजी व संरक्षण) २०१५ चे कलम ८०, ८१ प्रमाणे दिनांक १७/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, एकूण ०५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(३) संबंधित डॉक्टरांविरुध्द यापूर्वी बाळ विक्री केल्याप्रकरणी गुन्हा दाखल नाही.

(४) आरोपीतांविरूद्ध सबळ पुरावा प्राप्त झाल्याने मा.न्यायालयात दिनांक ३०/०६/२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महावितरण कंपनीने राज्यातील सर्व वीज ग्राहकांच्या अतिरिक्त अनामत सुरक्षा ठेवीमध्ये वाढ केल्याबाबत**

**(२५) * ६४७२७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.शेखर निकम (चिपळूण), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महावितरण कंपनीने राज्यातील सर्व वीज ग्राहकांना माहे, एप्रिल,२०२३ या महिन्यात पाठविलेल्या वीज देयकासोबत अतिरिक्त अनामत सुरक्षा ठेव रकमेची देयके पाठविल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुरक्षा ठेव म्हणून एका महिन्याच्या सरासरी देयका इतकी रक्कम आकारणी करण्याचे वीज नियामक आयोगाने ठरवलेले असतानाही महावितरण व इतर कंपन्यांनी दोन महिन्यांच्या सरासरी इतक्या रक्कमेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोविड तसेच अतिवृष्टी सारख्या नैसर्गिक संकटाने त्रस्त असतानाच महावितरण कंपनीने पाठविलेल्या अतिरिक्त देयकामुळे नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या मागणीमुळे ग्राहकांच्या वीज देयकात मोठी वाढ झाली असल्याने सदरील वाढीव देयके मागे घेण्याची मागणी विविध संघटनांनी महावितरणकडे वेळोवेळी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सुरक्षा ठेवीचा निर्णय मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी विनियम २०२१ च्या तरतुदीनुसार अतिरिक्त सुरक्षा ठेवीची स्वतंत्र देयके देण्यात आली आहेत.

(३) हे खरे नाही.

महावितरण कंपनीतर्फे अधिकची सुरक्षा ठेव रक्कमेची मागणी ही माहे एप्रिल, २०२१ मध्ये जुन्या विनियम २००५ नुसार एका महिन्याच्या सरासरी रक्कमे इतकी करण्यात आली होती. कोविड-१९ च्या परिस्थितीच्या अनुषंगाने नवीन विद्युत पुरवठा विनियम २०२१ नुसार नमूद करण्यात आलेली दुप्पट सुरक्षा ठेव घेण्यात आली नाही.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.